**प्रधान मुख्य वनसंरक्षक (हेड ऑफ फॉरेस्ट फोर्स), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय.**
**वनभवन, रामगिरी मार्ग, सिव्हील लाईन्स, नागपूर-४४० ००१**

गोपनीय.

क्र:-कक्ष-९/भावसे/बदली/प्रक्र.१४(ब)(०४-०५)/ ९३९ /१०-११
नागपूर- ४४० ००१, दिनांक : २९/४/२०१०

प्रति,
अपर मुख्य सचिव (वने),
महसूल व वन विभाग,
मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२.

विषय:- भारतीय वन सेवेतील अधिकाऱ्यांची बदली व पदस्थापनेबाबत.

संदर्भ:- मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), नागपूर यांचेकडील पत्र
क्र.कक्ष-१/अ/लले/३२, दिनांक ३१.३.२०१० (प्रत संलग्न).

चंद्रपूर येथील ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प हा देशातील एक अग्रगण्य व्याघ्र प्रकल्प असून सदर क्षेत्र हे अत्यंत संवेदनशील आहे. अशा व्याघ्र प्रकल्पाच्या व्यवस्थापनेचे कामदेखील योग्यरितीने चालू राहणे नितांत गरजेचे आहे. अलिकडेच या संरक्षित क्षेत्रालगत मानव-वन्यप्राणी संघर्षाची (Man-Animal Conflict) अनेक प्रकरणे उद्‌भवली असून त्यामुळे प्रसार माध्यमांमध्ये प्रकल्प व्यवस्थापनाबाबत विशेषत्वे दुर्मिळ होत असलेल्या व्याघ्र प्रजाती संदर्भात स्थानिक जनतेमध्ये वाढत असलेला द्वेष व विरोधाच्या संदर्भात अनेक बातम्या प्रसिध्द झालेल्या आहेत. या संरक्षित क्षेत्राचे निसर्ग पर्यटनाचे दृष्टीने महत्त्व व प्रसिध्दी निरंतर वाढत आहे, हे लक्षात घेता, या संरक्षित क्षेत्राचे व्यवस्थापन कर्तव्यनिष्ठ, वरिष्ठ व वनव्यवस्थापनासंबंधी अनुभव असलेल्या अधिकाऱ्याकडे वर्ग करणे अगत्याचे आहे.

सदर व्याघ्र प्रकल्पाच्या व्यवस्थापनेचे काम सध्या श्री.एस.पी.ठाकरे, वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक हे पाहत आहेत. या संदर्भात शासनास सादर करण्यात येते की, मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), नागपूर यांनी सादर केलेल्या अहवालानुसार, श्री.ठाकरे यांचे कामात वन्यजीव व्यवस्थापनाबाबत संभ्रम असून त्यांचे काम अत्यंत असमाधानकारक आहे. यावावत त्यांना संरक्षित क्षेत्रात वन्यजीव व्यवस्थापनाबाबत वेळोवेळी मार्गदर्शन करूनही त्याबाबत ते साधी दखलही घेत नसल्याचे तसेच इतर प्रशासकीय बाबींमध्येदेखील अत्यंत बेजबाबदार असल्याचे मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), नागपूर यांनी कळवून, त्यांची त्वरीत बदली करण्याबाबत विनंती केली आहे, जेणेकरून व्याघ्र प्रकल्पाचे व्यवस्थापन योग्य रितीने होईल, हे खालील बाबींवरून स्पष्ट होते.

केंद्र शासनाकडे महाराष्ट्र भारतीय वन सेवेच्या संवर्गाचे पुनर्विलोकन विचाराधीन असून त्यात वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर या पदाची श्रेणीवाढ मुख्य वनसंरक्षक या स्तरावर करणे प्रस्तावित आहे. तसेच या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-९/भावसे पुन/प्रक्र.९(००-०१)/२०५९, दिनांक १५.२.२०१० अन्वये

सुध्दा वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर या पदाच्या श्रेणीचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आलेला आहे. याबाबत केंद्र शासनाकडून लवकरच अधिसूचना जारी केली जाण्याची शक्यता आहे.

सध्या राज्य भावसे संवर्गावर वन्यजीव अभ्यासक्रम पदवीधारक अधिकाऱ्यांपैकी अपेक्षित वरिष्ठतम असलेला अधिकारी उपलब्ध नाही. श्री.एस.पी.ठाकरे हे सुध्दा वन्यजीव अभ्यासक्रम प्रशिक्षित नाहीत. करिता पर्यायाने मुख्य वनसंरक्षक स्तरावर पदोन्नतीस पात्र असलेल्या वरिष्ठ वनसंरक्षकांपैकी प्रस्तुत पदासाठी योग्य व सक्षम अधिकाऱ्याची पदस्थापना करता येईल.

करिता श्री.एस.पी.ठाकरे यांच्याऐवजी भारतीय वन सेवेच्या १९८३ च्या तुकडीतील श्री.विनय कुमार सिन्हा, प्रादेशिक व्यवस्थापक (मुख्यालय), महाराष्ट्र वन विकास महामंडळ, नागपूर यांची पदस्थापना वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर या पदावर करून श्री.एस.पी.ठाकरे यांची पदस्थापना प्रादेशिक व्यवस्थापक (मुख्यालय), महाराष्ट्र वन विकास महामंडळ, नागपूर या पदावर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

सहपत्र:-वरीलप्रमाणे.

मसूदा प्रमुवसं (वबप्र) कडून मान्य.

प्रधान मुख्य वनसंरक्षक
(वन बल प्रमुख),
महाराष्ट्र राज्य,नागपूरकरिता.